प्रेसनोट दि.२८/०७/२०१७

## "रिव्हयु देदे" हे ॲप्लिकेशन हॅक करुन कंपनीचे व्हाऊचर्स चोरी करुन फसवणुक करणाऱ्यास सायबर क्राईम सेल पुणे शहर कडुन कर्नाटक येथुन अटक

बाणेर पाषाण, पुणे येथील पोडियम सिस्टीम प्रा.लि. नावाचे सॉफ्टवेअरद कंपनीने सिनेमा संबंधीचे ट्रेलर ग्राहकांना दाखविणेसाठी "रिव्हुव देदे" या नावाचे ॲप्लीकेशन तयार केले असून सदर ॲपवरुन नवीन येणारे मुव्हीजचे व टेलिव्हीजन शोचे जाहीरात करीत असतात. सदर ॲप जास्त लोकांनी डाऊन लोड करावा व त्याचा वापर जास्तीत जास्त करावा म्हणुन कंपनीने लकी ग्राहकांसाठी बक्षीसे देण्यासाठी कार्नीव्हल सिनेमा, शॉपर्स स्टॉप, व पी.व्ही.आर.सिनेमा चे व्हाऊचर्स खरेदी केलेली आहेत. सदर ॲप स्मार्टफोन मोबाईलमध्ये डाऊनलोड करता येते.मोबाईल क्रमांक **७०१९९४६३५६ व ९३७१७७४९१६** वापरणा-या व्यक्तीने सदर "रिव्हुव देदे" हे ॲप डाऊनलोड करुन सदर ॲप्लिकेशन ची बॅकअप सिस्टिम हॅक करुन त्यामधील पी.व्ही.आर.सिनेमा चे ६७ व्हाऊचर, कारनिवल सिनेमा चे २६ व्हाऊचर, व शॉपर स्टॉपचे १३० व्हाऊचर असे एकुण २२३ व्हाऊचर चोरी करुन ते वापरुन सदर कंपनीची आर्थिक फसवणुक केली तसेच वेगवेगळया क्रमांकाना वेगवेगळया तपशीलाचे ज्यामध्ये अश्लील, व्यक्तीगत, बदनामीकारक व सिस्टम कशी हॅक करवायाची अशा स्वरुपाचे एस.एम.एस. पाठवुन फसवणुक केली असल्याबाबत कंपनीचे लक्षात आल्याने त्यांनी सायबर क्राईम सेल येथे तक्रार अर्ज दिला होता. सदर तक्रारी अर्जाचे चौकशीअंती **चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं. ३९४/२०१७ भादंवि. कलम ३८०, ४२० माहीती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६सी, ६६डी** अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचा समांतर तपास सायबर क्राईम सेल,गुन्हे शाखा, पुणे शहर यांचे मार्फतीने करण्यात येत होता. सायबर सेलव्दारे तांत्रिक तपास करुन आरोपी हा कर्नाटक सिरसी येथे असल्याबाबत निष्पन्न झाले होते. त्यानुसार सायबर सेलचे पथकाने कर्नाटक सिरसी येथे जावुन सदर आरोपीचा शोध घेवुन आरोपी नामे राहुल पी. हरिहरन वय-२२ मुळ रा.फ्लॅट नं.१ ओ ९१/९८ एन.जी.ओ.क्वॉर्टर्स, क्वॉर्टर्स रोड, वझारखाला, थ्रिकाकारा,एरनाकुलम,केरळ राज्य सध्या रा.वनश्री हॉस्टेल,रुम नं.१६,कॉलेज ऑफ फॉरेस्ट्री, सिरसी, जि.कारवार,कर्नाटक राज्य. यास सिरसी जि.कारवार, कर्नाटक येथुन ताब्यात घेवुन गुन्हयात अटक केली आहे. सदर आरोपी याचेकडुन त्याने गुन्हा करण्यासाठी वापरलेले दोन मोबाईल हस्तगत करण्यात आले आहेत. सदर कारवाई सायबर सेलचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ. राधिका फडके, पोलीस निरीक्षक गजानन पवार, पोउनि. सोनाली फटांगरे, पोहवा. अस्लम आत्तार, पोना. दिपक भोसले, पोशि. संतोष जाधव, पोशि. राहुल हंडाळ, पोशि.शाहरुख शेख यांचे पथकाने केली आहे.

सायबर सेल येथे आरोपी याचेकडे केले तपासामध्ये या गुन्हयात आरोपीने **reviewdede** हे अ‍ॅंड्राईड ॲप स्वतःचे मोबाईलमध्ये डाऊनलोड व इन्स्टॉल करुन घेतले त्यानंतर थर्ड पार्टी व्हर्नेबिलीटी सॉफ्टवेअरचे मदतीने त्या ॲपच्या सर्व त्रुटी शोधल्या, विशेषतः त्याचा सर्वात मोठी त्रुटी ही ॲन्ड्राईड ॲप मध्ये डाटा इन्क्रिप्शनमध्ये काहीच काळजी घेतली नसल्याचे दिसुन आले.त्यामुळे त्यास सदर ॲपचे बॅक एन्ड डाटा सर्वर मध्ये होणारे सर्व ट्रान्झॅक्शन त्याला व्हर्नाबिलीटी सॉफ्टवेअरचे मदतीने पाहता येवु शकले. या त्रुटीचा गैरफायदा आरोपी याने सदर ॲपचे युजर चा सर्व डाटा व गिफ्ट व्हाऊचर स्वतःकडे वळवुन घेतली असल्याचे उघड झाले आहे.

याद्वारे सर्व नागरिकांना आव्हान करण्यात येते की, ॲन्ड्रॉईड ॲप डेव्हलपर्स आणि ॲन्ड्रॉईड ॲप्स चा व्यावसायिक दृष्टीकोणातुन वापर करणा-या व्यक्तींनी तयार केलेले ॲन्ड्रॉईड ॲप्लिकेशन हे त्रुटीरहित असल्याचे प्रमाणपत्र हे सॉफ्टवेअर सिक्युरिटी ऑडीट नामांकन करणाऱ्या कंपनीकडुन प्राप्त करुन घेतल्यानंतरच त्याची प्रसिध्दी करावी.